## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥
# वाटी – लोणी – साखर

अढळ भक्तीची, भक्तीची चांदी आणविली
श्रध्दा भक्तीने वाटी बनविली
मन निर्मळ…निर्मळ करोनी केले मंथन
नवनीत शुध्द स्वच्छ घेतले काढून
या वाटीमध्ये सुंदर ठेवले लोणी
कधी पाहीन मी बाबांना बाई
उल्हास वाटला बहु बाई,कधी पाहीन बाबा बाई
माथा ठेवीन त्यांचे पायी, मन सद्गतीत पहाट झाली
सत्वर घ्या बाबा लोणी साखर
आले पायाशी नका देऊ अंतर, घ्या बाबा लोणी साखर
या वाटीला अंतरमनाने मी भुलले
बाह्य दुष्टीने नाही कधी मी पाहिले
शुध्द भक्तीचे सोने आणीयले
मुक्त मोती त्यात गुंफियले
ही वाटी ही सुंदर साजिरी दिसते
नवविध श्रध्दा त्या प्रतिबिंब दिसते
उल्हास वाटला चित्ती
कधी पाहीन श्री बाबासी
साठविन ह्रदयी ही मूर्ती
मन सद्गतीत पहाट झाली सत्वर
घ्या बाबा लोणी साखर
आले पायाशी नका देऊ अंतर, घ्या बाबा लोणी साखर

★★★★★